# L. A. BILL No. LII OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२४ चा महा. ८.

**ज्याअर्थी,** यात दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

एच-७९७–१

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा. **२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील, नोंद १० नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः- २०२४ चा महा. ८.

| | | |
|---|---|---|
| “११. | छत्रपती संभाजी महाराज विद्यापीठ, गोवंडी, मुंबई, मुख्यालय-सीटीएस नं. १, सर्वे नं. ९३, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, शिवाजी नगर, गोवंडी (प.), देवनार गाव, ता. कुर्ला, मुंबई ४०० ०४३. | १) श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, मुंबई- घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, शिवाजी नगर, गोवंडी (प.), मुंबई ४०० ०४३.<br>२) सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी, सेक्टर नं. १०, मिरा मार्ग, मानसरोसर, जयपूर, राजस्थान-३०२०२०. |
| १२. | अमृतवाहिनी विद्यापीठ, संगमनेर मुख्यालय- सर्वे नं. १६८, १६९/१/१, १६९/१/२, १६९/२, १७०, १७१/१, १७१/४, १७१/५, १७१/६, विजयनगर, वेल्हाळे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८; आणि सर्वे नं. ७२/३/४/५, घुलेवाडी कॅम्पस, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८. | अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्था, अमृतनगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८. |
| १३. | श्री एल. आर. तिवारी विद्यापीठ, मीरा-भाईंदर, मुख्यालय- सर्वे नं. २६७, मु. पो. मीरा रोड, ता.- ठाणे, जि.- ठाणे-४०११०७. | श्री राहूल एज्युकेशन सोसायटी, मदर मेरीज ज्यु. कॉलेज, नवघर रोड, भाईंदर (पू.), ठाणे-४०११०५.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ (२०२४ चा महा. ८) हा, महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठाची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की, शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे याबाबत त्याची खात्री पटल्यास, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोनमध्ये खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून त्याद्वारे खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

**३.** उक्त अधिनियमाच्या उक्त कलम ६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की,

(एक) श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, मुंबई- घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, शिवाजी नगर, गोवंडी (प.), मुंबई-४०००४३ आणि सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी, सेक्टर नं. १०, मिरा मार्ग, मानसरोसर, जयपूर, राजस्थान-३०२०२०;

(दोन) अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्था, अमृतनगर, संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८;

(तीन) श्री राहूल एज्युकेशन सोसायटी, मदर मेरीज ज्यु. कॉलेज, नवघर रोड, भाईंदर (पू.), ठाणे-४०११०५,

या प्रायोजक मंडळांनी, अनुक्रमे, पुढील विद्यापीठांच्या नावाने खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे :—

(एक) छत्रपती संभाजी महाराज विद्यापीठ, गोवंडी, मुंबई, मुख्यालय- सीटीएस नं. १, सर्वे नं. ९३, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, शिवाजी नगर, गोंवडी (प.), देवनार गाव, ता. कुर्ला, मुंबई-४०००४३;

(दोन) अमृतवाहिनी विद्यापीठ, संगमनेर मुख्यालय- सर्वे नं. १६८, १६९/१/१, १६९/१/२, १६९/२, १७०, १७१/१, १७१/४, १७१/५, १७१/६, विजयनगर, वेल्हाळे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८; आणि सर्वे नं. ७२/३/४/५, घुलेवाडी कॅम्पस, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर-४२२६०८;

(तीन) श्री एल. आर. तिवारी विद्यापीठ, मीरा-भाईंदर, मुख्यालय- सर्वे नं. २६७, मु. पो. मीरा रोड, ता.-ठाणे, जि.-ठाणे-४०११०७.

**४.** म्हणून, उपरोक्त स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्यासाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक**
**क्रमांक ५२.]**

**[महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व**
**विनियमन) अधिनियम, २०२३ यात**
**सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. ]

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.